40

FORM-1A

N.C.R.B.
I.I.F.-I

# पहिली खबर

0154208

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे ला.प्र.वि. मुंबई पहिली खबर क्र. 50, वर्ष 2021, दिनांक 30/12/21
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधि. 1988 कलमे Sections 7
(ii) अधिनियम Act ..., कलमे Sections ...
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...

3. (a) अपराधाची घटना : वार शनिवार, तारीख पासून 16/03/19 वेळ ..., तारीख पर्यंत 30/12/21 वेळ ...
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख 29/12/2021, वेळ 16:00 वा
Information received at P. S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. 37/21, तारीख 30/12/21 वेळ 23:30
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : प्रत्यक्ष, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यांपासून अंतर व दिशा ..., चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ...
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव मुंबई शहर, ठिकाणाचे नंबर [illegible] व भूमि गल्ली अभिलेख, रस्त्याचे नाव ...
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जिल्हाधिकारी व जिल्हाधिकारी कार्यालय मुंबई शहर
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ..., गांव ..., पोस्ट ..., तालुका ..., जिल्हा ..., राज्य ...
Nearest identifiable place ओल्ड कस्टम हाऊस, शहिद भगतसिंग मार्ग फोर्ट मुं. 01 Village Post Taluka Dist. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ..., तालुका ..., जिल्हा ..., राज्य ...
In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव जमाल अहमद मोहम्मद खान (b) वडिलांचे / पतीचे नाव मोहम्मद स्वामी खान
Name Father's / Husband's Name
(c) जन्म तारीख व वय 49 (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. 9324555786
Date of Birth and Age Nationality Phone No. 7021743859
(e) पारपत्र क्रमांक —, दिल्याचा दिनांक —, दिल्याचे ठिकाण — (f) व्यवसाय ...
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion मुस्लिम, जात Caste सुन्नी, जनजात Sub-Caste —
(h) पत्ता ..., गल्ली / सर्व्हे नं. ..., घर / नाव नं. ..., फोन / मो. नं. ..., पॅन नं. ..., वोटर्स नं. ...
Address : Ward House/Name No. Phone/Mo. No. PAN No. Card No.
रूम नं. 03 बी. कुमार मालमता चाळ, बेन सावना मार्ग
रस्त्याचे नाव ..., जवळचे प्रसिद्ध ठिकाण ..., गांव ..., पोस्ट ..., पो. स्टे. ...
Road नारियलवाडी, नागपाडा मुंबई 400090 Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका ..., जिल्हा ..., राज्य ..., सध्याचा पत्ता ...
Taluka Dist. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)
राजेश भाऊराव चव्हाण वय 32 वर्षे, धंदा - नोकरी, रा.ठि. रूम नं. 802 बी विंग, 8 वा माळा, वृंदावन सोसायटी, कर्वे नगर, कांजूरमार्ग, मुंबई

Y.P.P.–800 Reg.–(25×6=150 Lvs.)–2-2018–PA3–(K) 829

Scanned with OKEN Scanner

यातील फिर्यादी श्री जमाल अहमद मोहम्मद खान वय ४० वर्षे धंदा- आयात निर्यात, रा.ठि. रु.क्र.०३, बीकमसी मालमत्ता चाळ संत सावता मार्ग, नारियलवाडी, माझगाव, भायखळा, मुंबई-१० यांचा स्वतंत्र पानावर जबाब नोंद करण्यात आला असून त्यास नमुद गुन्ह्याची प्रथम खबरी अहवाल म्हणून संबोधण्यात येत आहे

समक्ष

( हणमंत क्षिरसागर )
पोलीस निरिक्षक
ला.प्र.वि. वरळी, मुंबई

(जमाल अहमद मोहम्मद खान)

Scanned with OKEN Scanner

फिर्याद दिनांक – ३०/१२/२०२१

श्री. जमाल अहमद मोहम्मद समी खान, वय ४९, धंदा – आयात/निर्यात व्यवसाय, रा.ठि.– रुम नं. ०३, बी.एम.सी. (मालमत्ता) चाळ, संत सावता मार्ग, नारियलवाडी, माझगांव, मुंबई – १०, मो.क्र. ९३२४५५५७८६/७०२१७४३८५९

...

मी वरील प्रमाणे असून वर नमुद पत्यावर माझ्या कुंटुबियासोबत १३ वर्षापासून राहत आहे. मी, लहान मुलाचे डायपर, चॉकलेट इत्यादी वस्तूंचा आयात/निर्यातचा व्यवसाय करीत असून सदर व्यवसायातील नफ्यामधून माझे कुटूंबाचा उदरनिर्वाह करतो.

मी राहत असलेल्या चाळीच्या जागेचा भू मापन क्र. ६२६, ६२७, ६२८, ६२९ ई विभाग, नारियलवाडी, माझगाव, भायखळा, मुंबई – १० असा असून सदरची जागा ही महाराष्ट्र शासनाची असून ती ९९ वर्षाच्या भाडेकरार तत्वावर मुंबई महानगरपालिकेला सन १९०६ मध्ये देण्यात आली होती. सदर काराराची मुदत संपल्यामुळे करार व जागेच्या कागदपत्रांसंदर्भात माहिती घेण्याकरीता मी दिनांक १६/०३/२०१९ रोजी माहिती अधिकार अधिनियम अन्वये जन माहिती अधिकारी, उप जिल्हाधिकारी तथा भू सपांदन अधिकारी, ओल्ड कस्टम हाऊस, पहिला माळा, डी.डी. बिल्डीग, मुंबई शहर यांना अर्ज केला होता. सदर अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी, उप जिल्हाधिकारी तथा भू सपांदन अधिकारी यांनी माझ्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असल्याचे आढळून येत नाही असे सांगून माझा अर्ज निकाली काढला.

सदर अर्जाच्या अनुषंगाने मी अपिलीय अधिकारी, उपजिल्हाधिकारी, (भूसपांदन), मुंबई शहर यांच्याकडे अपिल अर्ज केला होता. त्यावर अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०८/०७/२०१९ रोजी अपिलात तथ्य दिसून येत नसल्याने माझा अर्ज निकाली काढला.

सदरबाबत मी द्वितीय अपिल राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांच्याकडे केले. त्यांनी माझ्या अर्जावर दिनांक २७/०८/२०२१ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना विवेचनानुसार १५ दिवसात उत्तर पाठवावे असे सागून अर्ज निकाली काढला.

राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांनी दिलेल्या निकालाच्या अनुषंगाने श्री. प्रफुल्ल पाटील, शासकीय जन माहिती अधिकारी, तथा अव्वल कारकुन (भूसंपादन शाखा), मुंबई शहर यांच्याकडून क्र.उ.जि./भू.स./मुं.श./ज.अ. मो.स.खा/४४८/२०२१, दिनांक ०७/०९/२०२१ अन्वये मला पत्र प्राप्त झाले. त्यामध्ये असे नमुद करण्यात आले की, ' Land Acquired by L.A.D. Under Award No. 1907 Dt. 2.3.1923 in case M- 276 c for Bombay Municipal for the Construction of the Victoria Over bridge असा शेरा नमुद असल्याने भूसंपादनाची कार्यवाही दिनांक ०२/०३/१९२३ रोजी झाल्याचे दिसून येत आहे. तरी सदर मिळकती संबधित अभिलेख अधिक्षक नगर भूमापन व भूमी अभिलेख या कार्यालयाकडे असण्याची संभावना आहे. तरी आपण शासकीय जन माहिती अधिकरी, नगर भूमापन व भूमी अभिलेख यांच्याकडे अर्ज करण्यात यावा.

त्यानंतर मला पी.डी. चौधरी जन माहिती अधिकारी तथा सहा. अधिक्षक तथा न.भू.अ.क्र. १., मुंबई यांच्याकडून सीएसएलआर/एसॲण्डएल आर–१/टे/मा.अ./५८४/२०२१ दि.क ०४/१०/२०२१/जा. क्र. २३१३ अन्वये पत्र प्राप्त झाले त्यामध्ये असे नमुद करण्यात आले होते की, माझगाव विभागातील भूकर क्रमांक ६२६,६२७,६२८ व ६२९ या मिळकतीची मो.र.क्र. २५६/२०१४ ची धारिका या कार्यालयातील अभिलेख कक्षात उपलब्ध असून आपण या कार्यालयात कार्यालयीन वेळेत हजर राहून सदर धारिकेचे अवलोकन करावे तद्नंतर आपणांस आवश्यक असलेल्या कागदपत्राच्या प्रतीसाठी शासकीय फीचा भरणा कार्यालयीन दिवशी व वेळी केल्यास सदरच्या प्रती आपणांस उपलब्ध करून देण्याची तजवीन ठेवण्यात येत आहे.

दिनांक ११/११/२०२१ रोजी मी सहाय्यक अधिक्षक तथा न.भू.अ. क्र. १, मुंबई या कार्यालयात जाऊन मला पाहिजे असलेल्या संबधित संपूर्ण माहिती कागदपत्रांच्या अनुषंगाने रु ४००/– चा शासकीय फीचा भरणा केला. त्यावेळी मला दिनांक १५/११/२०२१ रोजी सबंधित माहिती घेऊन जाण्यास सांगितले.

Scanned with OKEN Scanner

प्र(४)

दिनांक १५/११/२०२१ रोजी मी संबधीत कार्यालयात गेलो. संबधीत अधिकारी पी.डी.चौधरी यांना भेटून ४३४१५८ या क्रमांकाची रु ४००/–चा शासकीय फीचा भरणा केल्याची पावती दाखविली असता त्यानी ती पावती घेऊन संबधीत शासकीय काम पाहणारे श्री. गणेश चव्हाण, महसुल सहाय्यक लिपीक/टंकलेखक यांना भेटण्यास सांगितले. त्यावेळी माहिती (पेपर्स) अजून तयार नाही तसेच अजून पैसे लागतील असे त्यांनी मला सांगितले. त्यामुळे मी पी.डी. चौधरी, जनमाहिती अधिकारी तथा सहायक अधिक्षक यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांनी फोन करून गणेश साहेबाना माहिती (पेपर्स) देण्याबाबत सांगितले.

दिनांक २७/१२/२०२१ रोजी मी गणेश साहेबाना माहिती तयार झाली का याबाबत माझ्या मोबाईल फोन क्रमांक ७०२१७४३८५९ वरून त्यांच्या मोबाईल क्रमांक ८०८०२५३०२६ फोन केला त्यावेळी त्यांनी सांगितले की, स्वाक्षरी होणे बाकी आहे नंतर या आणि येताना पैसे घेऊन या. माहिती अधिकार अंतर्गत शासकीय फीचा भरणा केल्यानंतर सुध्दा अधिक पैसे घेऊन येण्यास मला सांगितले.

मला श्री. गणेश यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक २९/१२/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे तक्रार करण्याचे ठरविले.

त्याप्रमाणे मी दिनांक २९/१२/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे वरिष्ठ अधिकाऱ्यांसमक्ष हजर राहिलो. त्यावेळी वरिष्ठांनी सांगितल्याप्रमाणे पो.नि. हणमंत क्षिरसागर यांचेकडे लिपीक श्री. गणेश यांचे विरुध्द स्व:हस्ताक्षरात हिंदीमध्ये तक्रार लिहुन दिली. पो.नि. हणमंत क्षिरसागर यांनी माझी लेखी तक्रार घेवुन माझे तक्रार अर्जाची दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी करण्यात येईल असे सांगुन त्वरीत दोन शासकीय पंचाना पाचारण केले. परंतु सदर दिवशी संबंधित कार्यालयाच्या कामकाजाची वेळ संपल्यामुळे पडताळणी करता येत नसल्यामुळे पो.नि. हणमंत क्षिरसागर यांनी दिनांक ३०/१२/२०२१ रोजी पडताळणी करण्यात येईल असे सांगितले.

दिनांक ३०/१२/२०२१ रोजी मी पुन्हा ला.प्र.विभाग कार्यालयात आलो. त्यावेळी पो.नि. क्षिरसागर हे मला पहिल्या मजल्यावरील गोपनिय कक्षामध्ये घेवून गेले. तेथे डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये पो.नि. हणमंत क्षिरसागर यांनी स्वत:चे, माझे व पंचांचे वक्तव्य रेकॉर्डींग केले.

त्यानंतर सापळा पथकातील पर्यवेक्षक अधिकारी पो.नि. लांघी, अंमलदार यांची ओळख करुन दिली त्यानतर मी, पंच, पोलीस पथकातील अधिकारी व अंमलदार असे शासकीय वाहनाने वरळी लाचलुचपत कार्यालय येथून पडताळणीसाठी रवाना झालो. शासकीय वाहन हुतात्मा चौकाजवळ ओरिएन्टल बिल्डींगजवळ, व्हॉईट हाउस रेस्टारन्टजवळ बाजूला थांबले. मला व पंच श्री. पंढरी उगले यांना पडताळणी दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत योग्य त्या सुचना दिल्या. तेथे माझे शर्टचे आतील बाजूस डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करून लावण्यात आले. त्यानंतर मी व पंच श्री. उगले असे चालत ओल्ड कस्टम हाऊस, डी.डी. बिल्डीग, मुंबई येथे गेलो. तेथे मी श्री. गणेश यांच्याकडे माहिती (पेपर्स) ची मागणी केली असता त्यांनी पेपर्स देण्यासाठी लाच म्हणुन रु. १,०००/– देण्याबाबत सांगितले. त्यावेळी मी रू. १,०००/– इतकी रक्कम आता माझयाकडे उपलब्ध नसुन मी एटीएम मधुन काढून घेवून येतो असे सांगितले व मी आणि पंच श्री उगले असे पायी चालत शासकीय वाहनाजवळ आलो.

पो.नि. हणमंत क्षिरसागर यांनी मला लावलेला व्हाईस रेकॉर्डर काढून तो बंद करून त्यांचे ताब्यात घेतला व पो.नि क्षिरसागर यांचे समक्ष माझ्याकडे आणि पंच श्री उगले यांचेकडे लोकसेवक व माझे प्रत्यक्ष भेटीत झालेल्या संभाषणाबाबत चौकशी केली असता मी वरील नमुद प्रमाणे माहिती दिली.

त्यानंतर पो.नि. हणमंत क्षिरसागर व पो.नि. लांघी यांनी माझे व लोकसेवक गणेश यांचे प्रत्यक्ष भेटी दरम्यान डिजीटल व्हाईस रेकार्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण शासकीय वाहनामध्ये पंचासमक्ष वाजवून ऐकले.

मी दिनांक २९/१२/२०२१ रोजी लोकसेवक श्री. गणेश यांचे विरुध्द दिलेल्या तक्रारी संदर्भात पडताळणी कारवाई दरम्यान रू. १०००/– च्या लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाल्याने, तात्काळ सापळा कारवाई आयोजित करणार असल्याचे पो.नि. हणमंत क्षिरसागर यांनी मला सांगितले. त्यावेळी मी माझया बचतीमधून आणलेली रु. १,०००/– ( भारतीय चलनातील रु. ५००/– च्या ०२ नोटा ) सोबत आणल्या असल्याचे पो.नि. हणमंत क्षिरसागर यांना सांगितले. सदर वेळी मी माझेकडील रक्कम रु. १,०००/– पो.नि. हणमंत क्षिरसागर यांचेकडे त्यांनी मागितल्यानुसार दिली. त्यानंतर माझी पंचासमक्ष अंगझडती घेण्यात आली. माझे पॅन्टच्या उजव्या बाजुचा खिसा वगळून इतर खिश्यामध्ये माझे अंगझडतीत मिळून आलेल्या वस्तु ठेवल्या. तद्नंतर मी दिलेल्या नोटांचे पो. नि.क्षिरसागर यांनी मोबाईलमध्ये फोटो काढून घेतले. त्यावेळी मला पंचासमक्ष अॅंथ्रसिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून अल्ट्रावायलेट लाईटचा वापर करून प्रात्यक्षिक करून दाखविले आणि नंतर मी दिलेल्या नमुद नोटांच्या दोन्ही

Scanned with OKEN Scanner

बाजूस चालक श्री. मोकल यांनी अँथ्रेसिन पावडर लावून, सदर रक्कम माझे शर्टच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेवली. त्यानंतर सापळा कारवाई दरम्यान करावयाचे कारवाई बाबत पो.नि. हणमंत क्षिरसागर यांनी मला व पंचांना तसेच सापळा पथकातील अंमलदारांना सुचना दिल्या व कारवाईचे आयोजन केले. तसेच लोकसेवक श्री. गणेश यांनी ओल्ड कस्टम हाऊस येथे लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर सापळा पथकातील सर्व अभिकारी व अंमलदार यांना दिसेल अशा पध्दतीने मी माझा मास्क काढुन त्याने चेहरा पुसल्यासारखी कृती करेन अशी सुचना केली.

तद्नंतर पो.नि. हणमंत क्षिरसागर यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करुन, माझे शर्टाचे आतिल बनियनला लावला. त्यानंतर मी व पंच श्री. उगले शासकीय वाहनातुन उतरून पायी चालत लोकसेवक श्री. गणेश यांचे ओल्ड कस्टम हाऊसच्या कार्यालयात जाण्यास निघालो. बाकीचे पथक कार्यालयाच्या आवारात कोणासही संशय येणार नाही अशा पध्दतीने लांब उभे राहिले.

मी व पंच श्री. उगले श्री. गणेश यांच्या भुमापन व अभिलेख कार्यालयात गेलो व त्यांच्याकडून माहिती अधिकारान्वये तयार झालेली माहिती (पेपर्स ) बाबत विचारण केली असता त्यांनी सदरचे पेपर्स मला दिले व लाचेच्या पैश्याबाबत खूणेने विचारले असता मी सोबत आणलेले रू १,०००/– शर्टाच्या डाव्या खिशातून काढून गणेश याच्या समोर धरली असता त्यांनी ती रक्कम स्विकारली व त्यांनी लाचेची रक्कम उजव्या हाताने स्विकारून त्यांच्या नेसणीस असलेल्या पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवून दिली. त्यावेळी मी सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांना दिसेल अशा पध्दतीने माझा मास्क काढुन चेहरा पुसल्याची कृती करून पुर्व नियोजीत इशारा केला. त्यावेळी तात्काळ पथकातील अंमलदारांनी पुढे येवून लोकसेवक श्री. गणेश यांचे दोन्ही हात मनगटाजवळ घट्ट पकडून त्यांना जागीच अटकावून ठेवले.

त्यानंतर पो.नि. हणमंत क्षिरसागर यांनी मला बोलावून माझ्या शर्टाच्या आतील बनियनला लावलेला डिजीटल व्हाईस रेकार्डर काढून घेवून तो बंद करून स्वत:कडे ठेवला व पो.नि.लांघी, पो.नि. हणमंत क्षिरसागर यांनी लोकसेवक गणेश यांना स्वत:ची ओळख सांगितली. त्यांनतर त्यांनी माझ्याकडे दिलेल्या लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता, मी सांगितले कि, सदरची रक्कम मी लोकसेवक श्री. गणेश यांना दिली असता त्यांनी ती स्विकारून त्यांचे नेसणीस असलेल्या पॅन्टच्या पुढील उजव्या खिशात ठेवली असल्याचे सांगितले. लोकसेवक श्री. गणेश यांनी लाचेची मागणी केलेली रक्कम स्विकारली असल्याने नमूद पथकाने त्यांना ताब्यात घेतले. त्यानंतर मी,पंच, पो.नि. लांघी व पोलीस पथक शासकीय वाहनाने लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, वरळी येथे आलो.

तरी लोकसेवक श्री गणेश चव्हाण, लिपीक टंकलेखक, महसूल भूमापन लिपीक, जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, ओल्ड कस्टम हाऊस, मुंबई यांनी मी केलेल्या माहिती अधिकार अधिनियम अन्वये मला जी माहिती देण्याकरीता आदेश झाले असून त्यांची शासकीय फी भरून देखील माझ्याकडे रू. १,०००/– इतकी लाचेची रक्कम मागुन दिनांक ३०/१२/२०२१ रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी दरम्यान लाचेची रक्कम स्विकारण्याचे कबुल करून सापळा कारवाई दरम्यान सदर रक्कम स्विकारली म्हणून माझी लोकसेवक श्री. गणेश चव्हाण यांचेविरूध्द कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे.

माझा श्री. गणेश चव्हाण यांचेशी कोणताही आर्थीक देवाण–घेवाणीचा व्यवहार किंवा त्यांचेशी कोणतेही वैमनस्य नाही.

माझा जबाब संगणकावर मराठीत टंकलिखित केला असून, तो मी वाचून पाहिला तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

( हणमंत क्षिरसागर )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई

Scanned with OKEN Scanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ तात्काळ ........
Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page
........................................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........ लाचेची रक्कम रु. 2000/-
Total Value of properties stolen / involved
(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........................
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.
नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांनी भूमापन क्र. 626, 627, 628 हे विभाग, वारियलवाडी माझगाव मुंबई येथील जागेच्या करारा संदर्भातील कागदपत्रांची माहिती अधिकार कायदे अंतर्गत माहिती मागितली होती त्याकरिता शासकीय फि रु. 400/- भरणा केली असताना देखील लोकसेवक गणेश साहेबराव चव्हाण यांनी फिर्यादीकडून कायदेशीर पारिश्रमिकाखेरीज स्वतःच्या फायद्याकरीता रु. 2000/- मागणी केली व ती स्विकारताना त्यांना रंगेहाथ पकडले असून त्यांचे विरुद्ध भ्र.प्र.अधि 1988 चे कलम 7 अन्वये गुन्हा नोंद

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : ........ पो.नि. क्षीरसागर ........

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,
........................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ................, जिल्हा ................, राज्य ................

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :
(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................ Rank............... No............... to take up the Investigation or
(2) Refused Investigation due to................................................ (3) Transferred to P. S. ................................................ District................................................ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name .... हणमंत क्षीरसागर
पदनाम Rank ........ पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. ........ ला.प्र.वि. मुंबई.
Posting
Code No. of I. O. ........................................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख....................
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with OKEN Scanner